# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 June 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ जून २०२५ दुपारी १.०० वा.

****

देशात पुढील महिन्यापर्यंत पुरेल इतका मुबलक प्रमाणात इंधन साठा उपलब्ध असल्याची माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदिपसिंग पुरी यांनी दिली आहे. यासंदर्भात या क्षेत्राशी संबंधीत वरीष्ठस्तरीय आढावा बैठकीनंतर समाज माध्यमावर आपल्या संदेशात त्यांनी ही माहिती दिली. ईराण–इस्राईल युद्धाच्या पार्श्वभुमीवर कालच झालेल्या इंधन दरवाढीच्या अनुषंगानं ही माहिती महत्वाची आहे. देशाचं ऊर्जा धोरण हे उपलब्धता वापर आणि स्थिरतेच्या यशावर आधारलेलं असल्याचं ते म्हणाले.

****

कैलास मानसरोवर यात्रेसाठी जाणारा यात्रेकरूंचा पहिला जथ्था उद्या सिक्कीमची राजधानी गंगटोक इथं पोहोचणार आहे. सिक्कीम सरकारने त्यांच्या स्वागतासाठी आणि सुरक्षेसाठी सर्व आवश्यक व्यवस्था केली आहे. पाच वर्षांच्या खंडानंतर २० जूनपासून कैलास मानसरोवर यात्रा सुरू होत आहे. या पार्श्वभुमीवर सिक्किमचे मुख्यमंत्री प्रेम सिंह तमांग हे नाथू ला खिंडीतून या यात्रेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. तर ३५ यात्रेकरूंचा एक गट उद्या काही सरकारी अधिकाऱ्यांसह गंगटोकला पोहोचणार आहे. या काळात सर्व यात्रेकरूंना आवश्यक वैद्यकीय सुविधा आणि इतर उपकरणे पुरवली जाणार असल्याचं पर्यटन आणि नागरी विमान वाहतूक विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव सीएस राव यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

****

इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि स्पेनमधील नामांकित जागतिक विद्यापीठांना आज मुंबईत एका कार्यक्रमात लेटर ऑफ इंटेंट, म्हणजेच भविष्यातील सहकार्याचे प्राथमिक औपचारिक घोषणापत्र सुपूर्द केले जाणार आहे. मुंबई आणि नवी मुंबईला आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे जागतिक केंद्र बनवण्याच्या दिशेने हे मोठे पाऊल आहे. `मुंबई रायझिंग`शी निगडीत या कार्यक्रमात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यासह विविध देशांतील विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

****

एक पृथ्वी – एक आरोग्य यासाठी योगाचा अवलंब या संकल्पनेतून यंदाचा योग दिन २१ जून रोजी साजरा होत आहे. अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर या संकल्पनेवर आधारीत `आंतरराष्ट्रीय योग कनेक्ट – २०२५` या जागतिक शिखर परिषदेला आज सकाळी नवी दिल्ली इथं प्रारंभ झाला. याप्रसंगी केंद्रीय सांस्कृतीक आणि पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय आरोग्य आणि कुटंब कल्याण तसंच आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, योगगुरु रामदेव बाबा यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिखर परिषदेचं उद्धघाटन झालं. योग ही भारतानं जगासाठी दिलेली अमुल्य भेट असल्याचं प्रतिपादन यावेळी केंद्रीय मंत्री शेखावत यांनी केलं. देश विदेशातील सुमारे एक हजार अभ्यासक या परिषदेत सहभाग घेणार आहेत. जगभरातल्या आंतरराष्ट्रीय योग संस्थांचे प्रतिनिधी दूरस्थ पद्धतीनं परिषदेत उपस्थित राहतील.

****

दुरसंचार विभागानं मोबाईलच्या सिमकार्ड विषयक नियमांत आता बदल केला आहे. यानुसार मोबाईलच्या प्रीपेड प्रकारातून पोस्टपेड किंवा पोस्टपेडमधून प्रिपेड प्रकारात योजना रुपांतरीत करण्याच्या प्रक्रीयेचा कालावधी तीस दिवस इतका कमी करण्यात आला आहे. म्हणजेच वापरत असलेली सेवा योजना काही कारणास्तव बदलायची असल्यास पुन्हा तीस दिवसात त्यात बदल करता येईल. याआधी प्रीपेड–पोस्टपेड बदलासाठी ९० दिवसांचा काळ लागत होता.

****

आज जागतिक रक्तदान दिवस साजरा होत आहे. २००४ या वर्षापासून हा दिवस साजरा होतो. जागतिक आरोग्य संघटना –डब्लुएचओ, रेड क्रॉस संघटना, आंतरराष्ट्रीय रक्तदाते संघटना यांच्या पुढाकारातून जागतिक स्तरावर या दिनाच्या अनुषंगानं जनजागृतीचं काम करण्यात येतं. 'रक्तदान करुया, नवी आशा निर्माण करुया: आपण सोबतीनं जीव वाचवूया' अशा संकल्पनेनुसार, यंदा रक्तदानाचं महत्व विशद केलं जात असून ठिकठिकाणी आज रक्तदान शिबिर घेतली जात आहेत.

****

अहमदाबाद येथील विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने श्रद्धांजली वाहिली. विमान अपघात हा प्रत्येक भारतीयाच्या किंवा संपूर्ण देशाच्या मनातील वेदना आहे तसेच अपघातात मृत्युमुखी पडलेल्या सर्व नागरिकांच्या कुटुंबियांनाही हादरवून टाकणारा आहे. यावेळी लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगेसंह अन्य मान्यवर उपस्थित होते.

****

अकोला जिल्ह्यात काल झालेल्या वादळी वाऱ्यांसह जोरदार पावसानं शेत आणि फळपिकांचं तसंच घरांचं मोठं नुकसान झालं. अकोट आणि पातूर तालुक्यातील ५८ गावांतील पपई, संत्रा, लिंबू आणि केळी या फळपिकांना पावसाचा तडाखा बसला तर फळपिकांचे १ हजार ६०७ हेक्टर क्षेत्र बाधित झालं आहे तसंच अकोट आणि मूर्तिजापूर तालुक्यातील ५७ घरांची पडझड झाली असल्याचा प्राथमिक अहवाल जिल्हा नैसर्गिक आपत्ती विभागाला प्राप्त झाला आहे. झालेल्या नुकसानीचे कृषी आणि महसूल यंत्रणेकडून पंचनामे झाल्यानंतर मदतीचा अहवाल शासनाला पाठविण्यात येणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचा जोर वाढलेला असून काल राजापूर तालुक्यात संध्याकाळनंतर जोरदार सरी कोसळल्या. हवामान विभागाच्या नोंदीनुसार, आज सकाळी साडेआठपर्यंत २४ तासांत राजापूर तालुक्यात ११९ पुर्णांक ८७ मिलिमीटर पाऊस झाला. या तालुक्यातल्या आडिवऱ्याच्या प्रसिद्ध महाकाली मंदिराच्या आवारात पाणी शिरलं.

****